## छंद पुष्परचनेचा - इकेबाना ६

**शोका** रचनांची माहीती घेण्याआधी या छंदाबद्दल चार गोष्टी !

पुष्परचनेचा छंद जोपासायचा असेल तर त्याचे पध्दतशीर शिक्षण घेता येते. वेगवेगळ्या देशात इकेनोबो स्कुलच्या शाखा आहेत. सुरुवातीला मोरीबाना रचना व काही मुक्तरचना शिकवल्या जातात. आठवडयातून एकदा वर्ग घेतला जातो. पाने, फुले, रंगसंगती याचा वापर व केव्हा, कुठे, कशी पुष्परचना करायची, त्यासाठी काय काय गोष्टींची जरुर आहे याची नजर हळुहळु तयार होते. यासाठी इकेनोबो स्कुलची अनेक पुस्तके उपलब्ध आहेत. जपानी लोकांनी पुष्परचनेचे शास्त्र गणितात बसवले आहे त्यामुळे ज्याने कधीच पुष्परचना केली नाही अशी व्यक्तीसुध्दा सहजपणे शिकू शकते. (पाने, फुले विशिष्ठ कोनात व ठराविक उंचीप्रमाणे वापरली जातात.) पुष्परचनेच्या परिक्षा देता येतात. एकूण सोळा परीक्षा असतात. बेसिक परीक्षेपासून सोळावी परीक्षा म्हणजे जणू डाक्टरेट ! अमेरिकेतील इकेनोबोचे मुख्य कार्यालय सॅनफ्रन्सिसकोला आहे.तिथुन सर्व पुस्तके, पिनहोल्डर, फ्लावर वाजेस मागवता येतात. कुठलीही कला जोपासताना त्यात सातत्य राखणे खुप महत्वाचे असते. परीक्षा दिल्याने यातील सातत्य व सराव राहतो. त्यामुळे अतिशय कल्पक, सुंदर, देखण्या रचना करयला जमु लागते. हा छंद जोपासताना निसर्गाच्या जवळ जाण्याची संधी मिळते.

शोका रचनांमधील दुसरा प्रकार -- **शोका शिंपूताई** याची माहीती आपण यावेळी घेणार आहोत.याला मॉडर्न शोका असेही म्हणले जाते. शोका रचनेमधील नियम इथे थोडे शिथील केलेले आहेत. मोरीबाना कींवा शोका रचना करताना नेहमी तीन फांद्या वापरल्या जातात. शिंपूताई रचनांमध्ये दोनच फांद्या व आशिराय वापरुन रचना करतात. **"शू"** व **"यो"** या दोन फांद्यांमधून विरोधाभास (कॉन्ट्रास्ट) दाखविणे हा या रचनेतील मुख्य भाग आहे. हा विरोधाभास दोन रंगांमधुन, दोन फांद्यांमधील स्ट्रेन्थ मधुन किंवा लाईन व मास यातून दाखविता येतो.

"**शू**" व **"यो"** या दोन्ही फाद्यांची किंवा फुलांची ऊंची रचनाकर आपल्या आवडीनुसार घेऊ शकतो. कोणत्याही प्रकारच्या पुष्पपात्रामध्ये या रचना करता येतात. या दोन फांद्या लावल्यावर रचनेचे सौंदर्य वाढविण्यासाठी आशिराय (फिलर) वापरतात. या रचनांमध्येही **मिझुगिवा** (मागील लेखात स्पष्टिकरण आले आहे) दिसणे आवश्यक मानले जाते. एखादे फुल, पान अथवा नाजुकशी फांदी वापरुनही या रचना करता येतात.



फोटो १ मधील रचनेत पिवळे शेवंतीचे फुल मास इफेक्ट दाखविते व मेपलच्या काडया लाईन दाखवितात.मनी प्लटचे पान आशिरायचे काम करते.



फोटो २ मधील रचनेत गुलाबी कारनेशन आणि पामचे पान यातुन रंगाचा विरोधभास दाखविला आहे.पांढरी नाजुक फुले आशिराय म्हणुन वापरली आहेत. फक्त गुलाबी फुल व पामचे पान वापरुन रचना पूर्ण वाटत नाही म्हणुन पांढरी फुले रचनेला पूर्णत्व देण्यासाठी आहेत.



फोटो ३ मधील रचनेत ड्रेसीनाची पाने व लाल ग्लडीओला यातुन रंगाचा विरोधाभास दाखविला आहे. पांढरे छोटे एक फुल आशिराय म्हणुन लावले आहे.

अगदी थोडे मटेरीअल वापरुन शिंपूताई शोका रचना करता येतात.

**सौ. अरुंधती देशपांडे**

**मेंबर, इकेनोबो इकेबाना फ्लोरल आर्ट,जपान**

**(मराठी विश्व यांच्या सौजन्याने) asdssd@gmail.com**